# पोलीस अधिक्षक बुलढाणा यांचे संकल्पनेतुन शेगाव येथे प्रिपेड ॲटो सेवा सुरू.

दि. ०३/०४/२०२५ रोजी संत नगरी शेगावात येनाऱ्या भाविक भक्त यांचा ऑटो चालकांशी वाद विवाद होऊ नये तसेच भक्तांना कुठलाही त्रास होऊ नये, यासाठी जिल्हा पोलीस दलाच्या वतीने शेगावात प्रायोगिक तत्त्वावर ऑटोची प्रीपेड सेवा सुरू केली आहे. पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांच्या संकल्पनेतून त्यांच्याच हस्ते या सेवेचे लोकार्पण आज गुरुवारी शेगावच्या रेल्वे स्थानकावर झाले.

शेगाव रेल्वे स्थानकामधून या प्रीपेड ऑटो सेवेचा लाभ भक्तांसह शहरातील नागरिकांना घेता येणार आहे.

- रेल्वे स्टेशन ते संत गजानन महाराज मंदिर प्रतिव्यक्ती दहा रुपये
- आनंद सागर व शहरातील इतर ठिकाणी वीस रुपयाचे

अशा प्रकारे दर ठेवण्यात आले आहे. शेगावातील ही सेवा प्रायोगिक तत्त्वावर असून हा उपक्रम जिल्ह्यातील इतर शहरांमध्ये भविष्यात राबविल्या जाणार आहे. कार्यक्रमा प्रसंगी अप्पर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा, शेगावचे ठाणेदार नितीन पाटील, पोलीस सहाय्यक निरीक्षक सोनटक्के, जयश्री गीते, पत्रकार राजकुमार व्यास, ऑटो संघटनेचे दिनेशबापू देशमुख आदींची यावेळी उपस्थित होती.




स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०